# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ 8064 /२०२३ पुणे दिनांक - 4 / 11 /२०२३

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, सिंहगड रोड वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी पार्किंगचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

सिंहगड रोड वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

१. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे जाताना गोयलगंगा चौकापासुन रोडचे दोन्ही बाजूस ३० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन तयार करण्यात येत आहे.**

२. **सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडून गोयलगंगा चौकाकडे जाताना सिंहगड क्षेत्रिय कार्यालय चौकापासून रोडचे दोन्ही बाजूस ३० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन तयार करण्यात येत आहे.**

३. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे जाताना गोयलगंगा चौक ते आय.सी.आय.सी.आय. बँके ते अमृतगंगा सोसायटी गेट नं. ४ (शोरबा हॉटेल) पर्यंत रोडचे डाव्या बाजुला फक्त दुचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**

४. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय चौकाकडे जाताना रोडच्या उजव्या बाजूस दुभाजक संपलेनंतर मनपा प्रस्तावित नाटयगृह ते अतिथी हॉटेल पर्यंत फक्त चारचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**

५. **गोयलगंगा चौकाकडुन सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय चौकाकडे जाताना रोडच्या उजव्या बाजूस एच.डी.एफ.सी. बँकेपासून ते सोबा ऑप्टिमा सोसायटीचे गेट (प्रेमाचा चहा शॉप) पर्यंत फक्त दुचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – 5 /11/२०२३ ते दिनांक – 18/11/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर